RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ८, अंक १०६] शुक्रवार, ऑगस्ट ५, २०२२/श्रावण १४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑगस्ट २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.**

क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.६२३/१३स.— ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा XXIV) चे कलम ७३ कब प्रमाणे राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याचे व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्याचे अधिक्षण, संचलन आणि नियंत्रण करण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत करण्याची तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे कलम ७३ कब पोट-कलम (२) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांनी शासन अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.६२३/१३स, दिनांक १ ऑगस्ट २०१९ अन्वये डॉ. जगदीश पाटील यांची राज्य सहकारी निवडणूक आयुक्त म्हणून ते ज्या दिनांकाला आपले पद धारण करतील त्या दिनांकापासून ३ वर्षांसाठी किंवा वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करतील यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती केली होती ;

आणि ज्याअर्थी, डॉ. जगदीश पाटील यांनी दिनांक ७ ऑगस्ट, २०१९ रोजी आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे पद धारण केलेले आहे व त्यामुळे ते दिनांक ६ ऑगस्ट, २०२२ पर्यंत सदर पद धारण करतील ;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाच्या कलम ७३कख पोट-कलम (२) मध्ये आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे म्हणून नेमणूक झालेल्या व्यक्तीची पुढे २ वर्षांसाठी पुनर्नियुक्तीसाठीची तरतूद आहे ;

म्हणून मी, भगत सिंह कोश्यारी, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कब, पोट-कलम (२) आणि इतर अनुषंगिक तरतुदी अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून डॉ. जगदीश पाटील यांची आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे म्हणून दिनांक ७ ऑगस्ट, २०२२ पासून पुढील २ वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांचे वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होतील यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्ननियुक्ती करीत आहे.

**भगत सिंह कोश्यारी,**
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya (Annex), Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 5th August 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

No. Sankirn-2013/C.R.623/ 13C.— Whereas, section 73CB of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (Mah.XXIV of 1961) provides for the constitution of the State Co-operative Election Authority for the purposes of superintendence, direction and control of the preparation of electoral rolls for, and conduct of, all elections to a society in the State of Maharashtra ;

And whereas, under sub-section (*2*) of the said section 73CB, the Governor of Maharashtra has appointed Dr. Jagdish Patil as the State Co-operative Election Commissioner, *vide* the Government Notification, Co-operation, Marketing and Textiles Department, No. Sankirn-2013/ C.R.623/13C, dated the 1st August, 2019, for the period of three years from the date on which he enters the office or till he attains the age of sixty-five years, whichever is earlier ;

And whereas, as Dr. Jagdish Patil has entered the said office on the 7th August, 2019, he shall hold the said office till the 6th August, 2022 ;

And whereas, sub-section (*2*) of the said section 73CB provides that the State Co-operative Election Commissioner so appointed may be re-appointed for a further period of two years ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 73CB of the said Act, and of all other powers enabling in this behalf, I, Shri Bhagat Singh Koshyari, the Governor of Maharashtra, hereby re-appoints Dr. Jagdish Patil as a State Co-operative Election Commissioner for a further period of two years with effect from 7th August, 2022 or till he attains the age of sixty-five years, whichever is earlier.

BHAGAT SINGH KOSHYARI,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANOOP KUMAR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.